

# महाराष्ट्र शासन

# अतिरिक्त अर्थसंकल्प २०१९-२०

# सर्वसाधारण चर्चा


**समर्थन**

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,

मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☏ ०२२-२२००३०६०

🖂: samarthanmumbai97@gmail.com

www.samarthanadvocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव: **आशिष भोसले**

संपादन : **मुक्ता भारती**

विश्लेषण आणि संकलन:
**रुपेश कीर -९८९२९३९६१७**

मांडणी व अक्षरजुळणी :
**प्रतिक्षा कोयंडे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार):
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
☎ ०२२-२२००३०६०

Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

## 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# दि. १८ जून, २०१९ रोजी सादर झालेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पातील महत्त्वाचे मुद्दे

१. दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी रु. ४ लक्ष ३ हजार २०७ कोटी एवढ्या रकमेचा अर्थसंकल्प सादर केला होता. आता नवीन बाबी द्वारे १९ जून, २०१९ रोजी १ हजार ५८६ कोटींची अर्थसंकल्पात वाढ झालेली आहे. म्हणजे एकूण अर्थसंकल्प आता रु. ४ लक्ष ४ हजार ७९३ कोटींचा झालेला आहे.

२. वर्ष २०१९-२० साठी रु. ३ लाख १४ हजार ६४० कोटींची महसुली जमा अंदाजित असून महसुली खर्च रु. ३ लाख ३४ हजार ९३३ कोटी इतका अंदाजित केला आहे. त्यामुळे वर्ष २०१९-२० मध्ये रु. २० हजार २९२ कोटींची महसुली तूट येणे अपेक्षित आहे. तर वर्ष २०१८-१९ मध्ये महसुली तूट रु. १५ हजार ३७४ कोटी ९० लाख एवढी अंदाजित आहे.

३. वर्ष २०१९-२० मध्ये भांडवली जमा रु. ६२ हजार ६९२ कोटी इतकी होणार असून शासनाने भांडवली खर्च रु. ४३ हजार ६६६ कोटी इतका होणार आहे म्हणजेच भांडवली खर्चात रु. २० हजार २६ कोटींची घट येणार आहे.

४. तर वर्ष २०१९-२० मध्ये शासनाची राजकोषीय तूट रु. ६१ हजार ६६९ कोटी इतकी आहे. तर प्राथमिक तूट रु. २६ हजार ४६२ कोटींची आहे.

५. वर्ष २०१९-२० मध्ये करा व्यतिरिक्त महसूल रु. १६ ८०६ कोटी जमा अंदाजित आहे. मात्र २०१८-१९ मध्ये हा महसूल रु. २२ हजार ७८४ कोटी अंदाजित केला होता म्हणजे वर्ष २०१९-२० मध्ये रु. ५ हजार ७३४ कोटींनी घट होणार असल्याचे निदर्शनास येते.

६. राज्यावरील कर्जाचा भार सातत्याने वाढत असून वर्ष २०१९-२० मध्ये तो रु. ४ लाख ७१ हजार ६४२ कोटींवर पोहोचला आहे. तर कर्जावरील व्याजा पोटी

शासनाला रु. ३५ हजार २०७ कोटी द्यावे लागणार आहेत. कर्ज व व्याज मिळून एकूण कर्जाचा विचार करता महाराष्ट्राच्या प्रत्येक नागरिकांच्या डोक्यावरील कर्ज रु. ४५ हजार ९३ इतके झाले आहे.

७. राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न रु. २९ लाख ७९ हजार ५५६ इतके असून ते मागील स्थूल उत्पन्न रु. २६ लाख ६० हजार ३१८ कोटींच्या तुलनेत १२ टक्क्याने वाढले आहे. तर एकूण कर्ज रु. ५ लाख ६ हजार ८४९ कोटी असून स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत हे प्रमाण १७ टक्क्यांवर गेले आहे.

८. वेतन निवृत्ती वेतन व व्याज यासाठी रु. १ लाख ८६ हजार ८१६ कोटी खर्च होणार असून एकूण महसुली जमा रु. ३ लाख १४ हजार ६४० कोटींच्या तुलनेत हे प्रमाण <u>५९.३७ टक्के</u> आहे.

९. वर्ष २०१७-१८ मध्ये शासनाला रु. ८९ हजार ६६१ कोटी ५७ लाखांचा कर महसूल जमा करण्यात अपयश आले होते. त्यामुळे शासनाच्या खात्यात अपेक्षित महसुलाचे प्रमाण घटले.

१०. वर्ष २०१७-१८ मध्ये <u>करेतर महसूल रु. ३ हजार ८६३ कोटींनी घटले.</u>

११. वर्ष २०१७-१८ मध्ये शासनाच १२ विभागांना रु. २६ हजार ६५७ कोटी ७२ लाखांची हमी दिली होती.

१२. राज्य शासनाकडे १५ लाख ९१ हजार ३९४ कर्मचारी असून त्यांच्या वेतनावर वर्ष २०१७-१८ मध्ये रु. ८४ हजार ९२७ कोटी खर्च झाले होते.

१३. वर्ष २०१८-१९ सालच्या पूर्वमानानुसार राज्य अर्थव्यवस्थेत ७.५ टक्के वाढ तर देशाच्या अर्थव्यवस्थेत ६.८ टक्के वाढ अपेक्षित आहे. वर्ष २०१८-१९ मध्ये कमी पाऊस सरासरी केवळ ७३.६ टक्के पाऊस झाल्याने <u>कृषी व संलग्न कार्य क्षेत्रात केवळ ०.४ टक्के वाढ अपेक्षित आहे.</u>

**१४.** **वर्ष २०१८-१९ मध्ये महाराष्ट्र राज्याचे दरडोई उत्पन्न रु. १ लाख ९१ हजार ८२७ असून ते <u>कर्नाटक रु. २ लाख ७ हजार ६२ तसेच तेलंगणा रु. २ लाख ६ हजार १०७ यांच्या पेक्षा कमी आहे.</u>**

**१५.** **मार्च, २०१९ पर्यंत राज्यातील २ कोटी ७८ शिधापत्रिकांपैकी सुमारे २ कोटी ४२ लाख शिधापत्रिकांची संगणकीकरण झाले असून ३६ लाख शिधापत्रिकांची संगणकीकरण बाकी आहे.**

**१६.** **महाराष्ट्राची लोकसंख्या ११ कोटी २४ लाख इतकी असून त्यापैकी ५ कोटी ९ लाख लोकसंख्या नागरी भागात राहत असून नागरी भागात राहणाऱ्या लोकसंख्ये पैकी १ कोटी ९० लाख (२३.३०टक्के) लोकसंख्या झोपडपट्टी मध्ये आपले जीवन कंठत आहे.**

**१७.** **निवडक राज्यातील स्त्री पुरुष प्रमाण पाहता महाराष्ट्रात ९२९ असून केरळ मध्ये १,०८४, आंध्र प्रदेश ९९३ तर कर्नाटकात ते ९७३ इतके अधिक आहे. तर अखिल भारताच्या स्तरावर देखील आपण मागे पडलो असून या स्तरावर हे प्रमाण ९४३ इतके आहे.**

**१८.** **राज्यातील मुला-मुलींच्या प्रमाणाचा विचार करता त्यात सातत्याने घट होत आहे. <u>महाराष्ट्रात हे प्रमाण केवळ ८९४ असून</u> केरळ ९६४, कर्नाटक ९४८, आंध्र प्रदेश ९३९, मध्य प्रदेश ९१८, उत्तर प्रदेश ९०२ तर अखिल भारतीय स्तरावर ९१८ इतके जास्त आहे.**

**१९.** **दरडोई उत्पन्नाचा विचार करता वर्ष २०१७-१८ मध्ये मुंबई २ लोक ९४ हजार ७३४, ठाणे २ लाख ४९ हजार ८९७, पुणे २ लाख ३४ हजार १०८, नागपूर २ लाख ५ हजार ८७८ इतके अधिक आहे त्या तुलनेत सर्वात कमी ७५ हजार ४८९, नंदुरबार ७८ हजार ९५, बुलढाणा ८० हजार ५०८, हिंगोली ८१ हजार २२४ तर गडचिरोली ८५ हजार ७२७ इतके कमी आहे. म्हणजे एकाच राज्यात**

जिल्हयाच्या उत्पन्नातील प्रगतीत व विकासात मोठ्या प्रमाणावर तफावत दिसून येते.

२०. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमानुसार राज्यात वर्ष २०१८-१९ मध्ये एकूण २ कोटी ७८ लाख २१ हजार शिधापत्रिका आहेत त्यापैकी सर्वात जास्त म्हणजे २ कोटी ३३ लाख ७० हजार केशरी शिधापत्रिका असून, २६ लाख २० हजार पिवळी शिधापत्रिका आहेत, तर शुभ्र शिधापत्रिका १८ लाख ३० हजार शिधापत्रिका आहेत. अंत्योदय अन्न योजना व प्राधान्यक्रम म्हणजे पिवळी शिधापत्रिका मागील वर्षी ६४ लाख ४४ हजार होती त्यात यावर्षी ३८.२४ कोटींनी कमालीची घट झाली आहे. तर केशरी शिधापत्रिका धारकाच्या यावर्षी मागच्या वर्षीच्या तुलनेत ७४ लाख ७४ हजार शिधापत्रिकांच्या संख्येत वाढ झाली आहे. त्यामुळे अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांना केशरी कार्डधारकात वर्ग केल्याची शक्यता अधिक आहे.

२१. ३० जून २०१८ पर्यंत ५०.३७लाख हेक्टर निर्मित सिंचन क्षमता असून प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र मात्र ३९.५० लाख हेक्टर आहे. प्रत्यक्ष सिंचित क्षेत्राचे प्रमाण ७८.४ टक्के राहिले आहे.

२२. राज्यात सुमारे ४२ लाख २ हजार कृषी पंप असून वर्ष २०१७-१८ मध्ये त्यापैकी ६६ हजार १७४ कृषि पंपांना वीज जोडणी उपलब्ध करून देण्यात आली.

२३. राज्यातील सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी आकारणी, वसुली व थकबाकी वर्ष २०१७-१८ मध्ये १ हजार ८४९ कोटी १९ लाख होती.

२४. राज्यात उद्योग निर्मितीचा विचार करता आतापर्यंत २० हजार ३२३ प्रस्ताव मंजूर झाले असून रु. १२ लाख कोटी ८६ हजार ६९६ कोटींची गुंतवणूक प्रस्तावित आहे मात्र आतापर्यंत केवळ ९ हजार ९८ उद्योग कार्यान्वयीत

झाले असून त्यामधून रु. ३ लाख ६ हजार ८२५ कोटींची गुंतवणूक झाली आहे. <u>प्रत्यक्ष गुंतवणुकीचे प्रमाण हे २३.८४ टक्के राहिले आहे.</u>

२५. राज्यामध्ये विशाल उद्योगांमध्ये रु. ८८ हजार २६८ कोटींची प्रत्यक्ष गुंतवणूक झाली असून त्यातून १ लाख ३३ हजार प्रस्तावित रोजगार निर्माण होणार आहे तर सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगात रु. १ लाख ६० हजार १६ कोटींची गुंतवणूक झाली असून त्यातून ५७ लाख ५१ हजार रोजगार निर्मिती होणार आहे.

२६. महाराष्ट्रात वर्ष २०१८ मध्ये १ लाख ९८ हजार २५२ सहकारी संस्था असून <u>त्यापैकी ३६ हजार ६७ संस्था तोट्यात आहेत. या सर्व तोट्यात चालणाऱ्या संस्थांचा संचित तोटा रु. ८ हजार २१० इतका आहे.</u> तर या संस्थांना येणारे कर्ज रु. १ लाख ४८ हजार ९५७ इतके प्रचंड आहे.

२७. नोंदणीकृत सहकारी साखर कारखान्यांची संख्या १७८ इतकी आहे. त्यापैकी केवळ १०१ साखर कारखान्यातून उत्पादन सुरु आहे. <u>त्यापैकी ८० कारखाने तोट्यात आहेत.</u>

२८. राज्यात सहकारी सूतगिरण्यांची संख्या २८५ इतकी आहे. <u>त्यापैकी ५८ सूतगिरण्या तोट्यात आहे.</u> त्यांचा एकूण संचित तोटा रु. १ हजार ८३७ कोटी इतका आहे.

२९. राज्यात बिगर कृषी सहकारी पतपुरवठा करणाऱ्या संस्थांची संख्या २० हजार ६६८ इतकी आहे. <u>त्यापैकी थकीत कर्ज रु. ८ हजार ९६ इतके आहे तर ४ हजार ५६९ संस्था तोट्यात आहेत</u> तर या संस्थांचा एकूण <u>संचित तोटा रु. १ हजार ६०६ कोटी इतका आहे.</u>

३०. वर्ष २०१८-१९ मध्ये राज्यामध्ये विजेची सरासरी कमाल मागणी १८,५०४ मेगावॅट होती त्यापैकी १८,७२९ मेगावॅटचा पुरवठा करण्यात आला म्हणजे <u>२२६ मेगावॅटची तूट</u> निर्माण झाली होती.

३१. राज्यामध्ये महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण सातत्याने वाढत असून वर्ष २०१८ मध्ये ही संख्या ३३ हजार ५५७ आहे जी मागील वर्ष पेक्षा १ हजार ५३४ ने अधिक आहे. वर्ष २०१८ मध्ये विनय भंगाचे १४ हजार ७५ गुन्हे घडले असून अपहरण व पळवून नेणे ७ हजार ७२७ तर बलात्काराचे ४ हजार ७६ गुन्हे घडले आहेत.

३२. बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे सातत्याने वाढत असून वर्ष २०१८ मध्ये १५ हजार ५४४ गुन्हे घडले आहेत. त्यापैकी ९ हजार १७४ मुलांना अपहरण करून पळवून नेण्यात आले आहे. तर २ हजार ६८८ बालकांवर बलात्कार झाले आहेत.

३३. वर्ष २०१११८-१९ मध्ये प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानावर वर्ष २०१६-१७ ते २०१८-१९ या तीन वर्षात १ लाख ५४ हजार ९५ उमेदवार होते त्यापैकी ५३ हजार ९०३ उमेदवारांना रोजगार / स्वयंरोजगार प्राप्त झाले तर त्यावर रु. १८६ कोटी ४१ लाख २९ हजार खर्च करण्यात आले. प्रत्येक उमेदवारावर सरासरी रु. ३४ हजार ५८३ सरासरी खर्च झाला.

३४. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत १७ लाख ८४ हजार कुटुंबाना रोजगार पुरविण्यात आला. त्यामधून ८ कोटी ३७ लाख मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाली असून २ लाख ९४ हजार ४६० कामे पूर्ण झाली आहेत. तर या योजनेवर रु. २ हजार ३६५ कोटी ७६ लाख खर्च झाले आहेत. मात्र प्रति कुटुंब १०० दिवस रोजगार पुरवण्यात शासनाला अपयश आले असून प्रति कुटुंब रोजगार केवळ ४७ दिवसच मिळाला आहे.

३५. वर्ष २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे हा केंद्र शासनाचा महत्वकांक्षी उपक्रम आहे. मात्र शासनाला हा उपक्रम राबविण्यात अपयश आल्याचे दिसते वर्ष २०१६-१७ ते २०१८-१९ या तीन वर्षांमध्ये शासनाच्या म्हाडा संस्थेने केवळ १७ हजार ३२९ घरे बांधली तर सिडकोने १ लाख ८३ हजार ११० घरे बांधली आहेत,

झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत ३६ हजार २४५ तर प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत ३ लाख ३५ हजार २६३ घरे बांधण्यात आली आहेत.

३६. अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत वर्ष २०१८-१९ मध्ये रु. ९ हजार ९४९ कोटी २२ लाखांचा नियतव्यय देण्यात आला होता मात्र या कार्यक्रमासाठी रु. ६ हजार ४६८ कोटी ७५ लाखांचा खर्च करण्यात आला एकूण नियतव्ययाच्या तुलनेत खर्चाचे प्रमाण केवळ ६५ टक्के राहिले आहे म्हणजे ३५ टक्के निधी खर्चच झालेला नाही.

३७. आदिवासी घटक कार्यक्रमाचा विचार करता वर्ष २०१८-१९नमध्ये रु. ८ हजार २८२ कोटी १० लाख इतका नियतव्यय निर्धारित केला होता त्यापैकी रु. ७ हजार २९१ कोटी ९२ लाख खर्च करण्यात आले. एकूण नियतव्ययाच्या तुलनेत खर्चाचे प्रमाण ८८ टक्के आहे. याचा अर्थ १२ टक्के निधी अखर्चित राहिला.

३८. आर्थिक वर्गवारीनुसार राज्यात काम करणाऱ्या लोकांची संख्या ४ कोटी ९४ लाख २८ हजार एवढी असून काम न करणाऱ्या मनुष्य बळाची संख्या ६ कोटी २९ लाख ४६ हजार इतकी आहे. त्यापैकी पुरुषांची संख्या २ कोटी ५६ लाख २६ हजार असून महिलांची संख्या ३ कोटी ७३ लाख २० हजार इतकी आहे.